आजचे पंचांग

दिनांक : २५ ऑगस्ट २०२६ वार : मंगळवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : त्रयोदशी तिथी नक्षत्र : उत्तराषाढा नक्षत्र (रात्री १०:५० पर्यंत) त्यानंतर श्रवण नक्षत्र योग : आयुष्मान योग (सकाळी ०७:४० पर्यंत) त्यानंतर सौभाग्य योग करण : कौलव करण (सायंकाळी ०७:१३ पर्यंत) त्यानंतर तैतुला करण चंद्र राशी : मकर राशी

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


### समुद्रात मालवाहू जहाज बुडाले; २२ जण बेपत्ता

**नवी दिल्ली :** भारताच्या पूर्व किनाऱ्याजवळ पनामा देशाचा ध्वज असलेले मालवाहू जहाज बुडाल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. 'ओशन विनर' नावाच्या या जहाजावर एकूण २४ कर्मचारी होते. त्यापैकी दोन चिनी नागरिकांना वाचवण्यात यश आले असून, उर्वरित २२ जण अद्याप बेपत्ता आहेत. रविवारी, २३ ऑगस्ट रोजी भारतीय तटरक्षक दल आणि नौदलाने बेपत्ता कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यासाठी मोठी शोध व बचाव मोहीम सुरू ठेवली. जहाजाने अचानक एका बाजूला झुकण्यास सुरुवात केली आणि त्यानंतर अवघ्या आठ मिनिटांत ते समुद्रात बुडाले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३२७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### मंत्रिमंडळाच्या घोषणांचा पाऊस; प्रत्यक्षात काम कधी सुरू होणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सोमवारी विविध विभागांशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. अहिल्यानगर येथे डॉ. बाळासाहेब विखे पाटील खासगी आरोग्य विज्ञान विद्यापीठाला मंजुरी, नागपूर येथे लता मंगेशकर विद्यापीठ स्थापनेचा निर्णय, क्रीडापटूंच्या रोख बक्षिसांच्या धोरणात सुधारणा, जत नगरपरिषदेसाठी प्रशासकीय इमारतीसाठी जागा आणि पिंपळगाव बसवंत येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयासाठी पदांना मंजुरी अशा घोषणा करण्यात आल्या.

मात्र, मंत्रिमंडळाच्या निर्णयांची घोषणा होणे आणि त्या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे यात मोठी दरी असल्याचा अनुभव महाराष्ट्राला नवा नाही. त्यामुळे प्रश्न केवळ काय मंजूर झाले? हा नसून प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार? हा आहे. अहिल्यानगर येथील प्रस्तावित आरोग्य विज्ञान विद्यापीठात वैद्यकशास्त्र, दंतवैद्यक, फिजिओथेरपी आणि नर्सिंगमधील पदवी, पदव्युत्तर आणि सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन आहे. ही घोषणा प्रत्यक्षात आली तर परिसरातील विद्यार्थ्यांना आणि आरोग्य क्षेत्राला मोठा फायदा होऊ शकतो. पण विद्यापीठासाठी पायाभूत सुविधा, अधोसंरचना, मान्यता, अभ्यासक्रम आणि प्रत्यक्ष शैक्षणिक कामकाज कधी सुरू होणार, याचे स्पष्ट वेळापत्रक सरकारने जाहीर करणे आवश्यक आहे. नागपूरच्या विद्यापीठापासून न्यायालयाच्या पदनिर्मितीपर्यंत प्रत्येक निर्णयाचा थेट संबंध नागरिकांच्या भविष्यातील सुविधांशी आहे. क्रीडा क्षेत्रातील बक्षिसांच्या निर्णयामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल; मात्र त्यासाठी शासन निर्णय, निधी वितरण आणि पात्र खेळाडूंपर्यंत रक्कम पोहोचणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेणे सोपे; त्या निर्णयाला जमिनीवर उतरवणे ही खरी प्रशासनाची परीक्षा. त्यामुळे सरकारने प्रत्येक घोषणेसोबत निधी, अंमलबजावणीची तारीख आणि जबाबदार यंत्रणा जाहीर करावी. अन्यथा दर आठवड्याला होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठका केवळ घोषणांची यादी वाढवतील; नागरिकांच्या सुविधा मात्र कागदावरच राहतील. आता प्रश्न एकच मंजुरी मिळाली, पण प्रत्यक्षात काम कधी?

# पुण्यात ‘छात्रों की गूंज’चा आवाज दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयापर्यंत? महिला आंदोलकांना अखेर थेट तक्रारीचा मार्ग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : : प्रतिनिधी**

२४ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात नीट आंदोलनातील महिला आंदोलकांच्या कथित लैंगिक छळाच्या तक्रारींबाबत महत्त्वाची भूमिका समोर आली. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, २० जुलै रोजी जंतरमंतरवरील नीट आंदोलनादरम्यान पोलिसांकडून कथित लैंगिक छळ किंवा गैरवर्तन झाल्याच्या तक्रारी महिला आंदोलक उच्चस्तरीय चौकशी समितीच्या नोडल अधिकाऱ्याकडे थेट दाखल करू शकतात. हा नोडल अधिकारी न्यायिक अधिकारी असेल.

या प्रकरणाची पार्श्वभूमीही तितकीच गंभीर आहे. २० जुलै २०२६ रोजी नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीविरोधात देशभर विद्यार्थी आंदोलन करत होते. या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून अतिरेकी बळाचा वापर, मारहाण आणि महिला आंदोलकांशी गैरवर्तन झाल्याचे आरोप करण्यात आले. त्यानंतर २० ऑगस्ट २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने पाच सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली. समितीचे नेतृत्व सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती सुभाष रेड्डी करत आहेत.

मात्र आता प्रश्न उपस्थित होतोमहिला आंदोलकांच्या कथित लैंगिक छळाच्या तक्रारींसाठी स्वतंत्र आणि संवेदनशील व्यवस्था निर्माण करण्याची गरज न्यायालयात २४



ऑगस्टलाच का अधोरेखित झाली? वरिष्ठ वकील शोभा गुप्ता यांनी सोमवारी न्यायालयाचे लक्ष या गंभीर आरोपांकडे वेधत पीडित महिलांना थेट तक्रार नोंदवण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी, अशी मागणी केली. त्यावर सरन्यायाधीशांनी समितीला या तक्रारींची प्राधान्याने चौकशी करून अंतरिम अहवाल लवकर सादर करण्याचे निर्देश आधीच दिल्याचे स्पष्ट केले.

आणि इथेच पुण्यातील २२ ऑगस्टच्या ‘छात्रों की गूंज’ कार्यक्रमाची राजकीय पार्श्वभूमी चर्चेत येते. राहुल गांधींच्या या कार्यक्रमात केवळ महिला विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. शिक्षण, महिला सुरक्षा, समानता, स्पर्धा परीक्षा आणि रोजगार या मुद्द्यांवर संवाद झाला. कार्यक्रमासाठी पुणे पोलिसांनी तब्बल ३० अटी घातल्या होत्या आणि सुमारे ८ ते १० हजार लोकांच्या उपस्थितीचा अंदाज व्यक्त केला होता.

म्हणूनच राजकीय प्रश्न अपरिहार्य आहेपुण्यात राहुल गांधींनी महिला विद्यार्थिनींच्या सुरक्षितता, स्वातंत्र्य आणि आवाजाचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर आक्रमकपणे मांडल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत सर्वोच्च न्यायालयाने महिला आंदोलकांच्या कथित लैंगिक छळाच्या तक्रारींना प्राधान्य देण्याचे स्पष्ट केले, हा केवळ योगायोग आहे का?

पण राजकीय संदेश मात्र स्पष्ट आहेमहिला आंदोलकांच्या आवाजाकडे दुर्लक्ष करणे आता सोपे राहिलेले नाही. रस्त्यावरचा विद्यार्थी प्रश्न पुण्यातून राजकीय व्यासपीठावर पोहोचतो आणि त्याच काळात दिल्लीतील सर्वोच्च न्यायालय त्याच आंदोलनातील महिला सुरक्षेच्या आरोपांकडे प्राधान्याने पाहण्याचे निर्देश देते.

आता खरी कसोटी एका प्रश्नाची आहेचौकशी समिती फक्त अहवाल देणार, की दोषी आढळल्यास पोलिसांवर प्रत्यक्ष कारवाईही होणार? कारण न्यायालयाचा दरवाजा उघडला आहे; आता न्याय मिळतो का, हे पाहणे बाकी आहे.

## १५० पाकिस्तानी वधूंना भारतात प्रवेश; मग सामान्य नागरिकांसाठी व्हिसाचे दरवाजे किती उघडे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर : प्रतिनिधी**

भारत–पाकिस्तान संबंधांमध्ये तणाव कायम असताना पाकिस्तानातील सिंधी समाजातील सुमारे १५० वधूंना भारतात विवाहासाठी प्रवेश मिळाल्याचे समोर आले आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर वाघा–अटारी मार्गावरील प्रवास आणि व्हिसा प्रक्रियेत निर्बंध आल्याने या महिलांची लग्ने रखडली होती. मात्र, केंद्र सरकारच्या विशेष परवानगीमुळे या वधू आणि त्यांच्या नातेवाईकांना तिसऱ्या देशांमार्गे हवाई प्रवास करून भारतात येता आले.

नागपूरचे सिंधी समाजाचे नेते राजेश झांबिया यांच्या माहितीनुसार, एप्रिल २०२६पासून सुमारे १५० पाकिस्तानी वधू आणि त्यांचे कुटुंबीय दुबई, ओमान, श्रीलंका, बांगलादेश आदी मार्गे भारतात दाखल झाले आहेत. यामध्ये नागपूरशी संबंधित सुमारे १५ प्रकरणांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणामागची प्रक्रिया मात्र महत्त्वाची आहे. अटारी मार्गाने भारतात येण्यास अडथळे निर्माण झाल्यानंतर पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील भारतात विवाह ठरलेल्या महिलांची यादी तयार करण्यात आली. रायपूरस्थित शदानी दरबारच्या माध्यमातून ही यादी केंद्रीय गृह मंत्रालयाकडे देण्यात आली. त्यानंतर संबंधित वधू आणि त्यांच्या नातेवाईकांना भारतात येण्यासाठी विशेष परवानगी देण्यात आली; मात्र त्यांना हवाई मार्गानेच प्रवास करण्याची अट ठेवण्यात आली होती. याच ठिकाणी सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने मोठा प्रश्न निर्माण होतो. १५० वधूंना भारतात प्रवेश मिळाला म्हणजे पाकिस्तानातील कोणत्याही सामान्य नागरिकासाठी भारताचा व्हिसा सहज उपलब्ध झाला, असा निष्कर्ष काढता येत नाही. उपलब्ध वृत्तांमध्ये या प्रकरणाला विशेष परवानगीच्या स्वरूपात मांडण्यात आले आहे. त्यामुळे विवाहाचे कारण, आधीचे नाते, संबंधित कागदपत्रे, सुरक्षा तपासणी आणि केंद्र सरकारची मंजुरी या सर्व बाबींचा विचार झाल्यानंतरच प्रवेश देण्यात आल्याचे दिसते. यामुळे आता आणखी एक प्रश्न समोर येतोजर मानवी आणि कौटुंबिक कारणांचा विचार करून १५० वधूसाठी विशेष मार्ग काढता येत असेल, तर भारत–पाकिस्तानमधील इतर विभक्त कुटुंबे, वृद्ध नातेवाईक, आजारी व्यक्ती किंवा वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या कौटुंबिक प्रकरणांसाठी काय धोरण आहे? कारण या प्रकरणात केंद्र सरकारने कठोर निर्बंधांच्या चौकटीतही मानवी नात्यांसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे आता त्या प्रक्रियेचे निकष पारदर्शक असणे महत्त्वाचे ठरते. कोणाला विशेष परवानगी मिळणार आणि कोणाला नाही, याचे स्पष्ट नियम सर्वांसमोर असणे गरजेचे आहे.

दरम्यान, पाकिस्तानात अजून सुमारे ३०० पाकिस्तानी सिंधी महिला भारतात विवाहासाठी येण्याच्या प्रतीक्षेत असल्याचा दावा राजेश झांबिया यांनी केला आहे.

## पदव्या वाढल्या, पण नोकऱ्या कुठे? तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न सरकार कधी गांभीर्याने घेणार?

### शिक्षण, कौशल्य आणि रोजगार यांच्यातील दरी वाढली; बेरोजगारी, पेपरफुटी आणि भरतीतील विलंबामुळे तरुणांचे भविष्य अधांतरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

भारताची तरुण लोकसंख्या ही देशाची मोठी ताकद मानली जाते. मात्र, शिक्षण पूर्ण केल्यानंतरही स्थिर आणि दर्जेदार रोजगार मिळत नसेल, तर हीच लोकसंख्या विकासाची संधी न ठरता सामाजिक असंतोषाचे कारण बनू शकते. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी नीती आयोगाच्या अहवालाचा आधार घेत केंद्र सरकारच्या रोजगार धोरणावर उपस्थित केलेले प्रश्न त्यामुळे गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

खर्गे यांच्या मते, १५ ते २९ वयोगटातील सुमारे ८.७ कोटी तरुण शिक्षण, रोजगार किंवा प्रशिक्षणापासून दूर आहेत. त्यापैकी मोठ्या संख्येने तरुण घरगुती कामांमध्ये गुंतलेले आहेत. जुलै २०२६च्या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षणाचा संदर्भ देताना त्यांनी तरुणांमधील बेरोजगारीचा दर १५.६ टक्के, तर तरुण महिलांमधील बेरोजगारीचा दर १९.५ टक्के असल्याचे नमूद केले आहे.

याहून चिंताजनक बाब म्हणजे पदवी मिळवल्यानंतरही रोजगाराची हमी उरलेली नाही. खर्गे यांच्या दाव्यानुसार, २० ते २९ वयोगटातील बेरोजगारांमध्ये पदवीधरांचे प्रमाण ६७ टक्के आहे. तरुण वर्षानुवर्षे शिक्षण घेतात, कर्ज काढून त्याचा खर्च भागवतात आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करतात; पण शेवटी त्यांच्या हातात पदवी आणि समोर बेरोजगारी उरते. ही परिस्थिती शिक्षणव्यवस्था आणि रोजगार धोरण यांच्यातील गंभीर तफावत अधोरेखित करते.

आश्वासनांपलीकडे रोजगाराचा हिशेब हवा

दरवर्षी दोन कोटी रोजगार देण्याच्या आश्वासनाचा संदर्भ देत खर्गे यांनी सरकारला जाब विचारला आहे. त्यांच्या मते, बारा वर्षांत २४ कोटी रोजगार निर्माण व्हायला हवे होते. प्रत्यक्षात सरकारी विभागांतील रिक्त पदे, भरती प्रक्रियेतील विलंब आणि वाढता कंत्राटी रोजगार यामुळे तरुणांमधील अस्वस्थता वाढत आहे.

## इंदू मिलमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय स्मारक वेळेत पूर्ण करा

### सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचे निर्देश; कामाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि वेळेच्या नियोजनाला सर्वोच्च प्राधान्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल, दादर येथील भव्य आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम दर्जेदार पद्धतीने आणि निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले. कामाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि वेळेचे नियोजन यांना सर्वोच्च प्राधान्य देत सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

इंदू मिल येथे उभारण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामाचा शिरसाट यांनी आढावा घेतला. स्मारकाच्या विविध भागांत सुरू असलेली कामे, साहित्याची उपलब्धता, वाढीव कामे आणि प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

या स्मारकाची एकूण उंची ४५० फूट असून त्यामध्ये १०० फूट उंच पदपीठ आणि ३५० फूट उंच पुतळा असणार आहे. हे स्मारक देशासह जगभरातील नागरिकांसाठी प्रेरणास्थळ ठरणार असल्याने त्याची उभारणी जागतिक दर्जाची असावी, यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचना शिरसाट यांनी दिल्या.

स्मारकाच्या इमारतीचे बहुतांश काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतिपथावर आहे. प्रकल्पाच्या विविध टप्प्यांमध्ये प्रभावी समन्वय राखण्यासाठी सक्षम व्यवस्थापन यंत्रणा कार्यरत ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

वाढीव कामांसाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, साहित्य आणि यंत्रसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. कामाची गती कायम ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार २४ तास कामकाजाचे नियोजन करावे आणि विविध एजन्सींमध्ये प्रभावी समन्वय साधावा, असेही मंत्री शिरसाट यांनी स्पष्ट केले.

वाढीव कामांचा सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश एमएमआरडीएला देण्यात आले आहेत.

स्मारक परिसरात विविध सुविधा

स्मारक परिसराचा संपूर्ण विकास हरित परिसर म्हणून करण्यात येणार आहे. येथे सुमारे १ हजार व्यक्तींची आसनक्षमता असलेले सभागृह, संशोधन केंद्र, ध्यानधारणा केंद्र, ग्रंथालय आणि भूमिगत वाहनतळ यांसारख्या सुविधा उपलब्ध असणार आहेत.

तीव्र वादळांसह विविध नैसर्गिक आपत्तींपासून स्मारकाचे संरक्षण करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहितीही यावेळी देण्यात आली. प्रकल्पासाठी आवश्यक निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येत असून उर्वरित कामे गतीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश शिरसाट यांनी दिले.

या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, एमएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त पी. वेलरासू, सहसचिव बागुल, दूरदृश्य प्रणालीद्वारे अनिल सुतार तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## आरक्षणाचा तिढा की सत्तेची परीक्षा? जरांगे पाटलांच्या एल्गाराने सरकारसमोर पुन्हा मोठे आव्हान

### २९ ऑगस्टचे आंदोलन ठरले; मागण्या पूर्ण करण्यासाठी २८ ऑगस्टची मुदत 'आता सरकारकडे निर्णय, अंमलबजावणी आणि विश्वास या तिन्हींची परीक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जालना : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटीत आंदोलन करण्याचा निर्धार जाहीर केला आहे. सरकारच्या शिष्टमंडळाने सोमवारी त्यांची भेट घेतली असली, तरी चर्चेनंतर आंदोलन मागे घेण्याची भूमिका जरांगे यांनी स्वीकारलेली नाही. त्यामुळे सरकार आणि मराठा आंदोलन यांच्यातील संघर्ष पुन्हा तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शंभूराज देसाई आणि उदय सामंत यांनी जरांगे पाटील यांची भेट घेऊन सरकारची भूमिका मांडली. मात्र, चर्चेनंतर जरांगे यांनी २९ ऑगस्टला आंदोलन होणारच अशी भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सरकारसमोर २८ ऑगस्टपर्यंतची मुदत ठेवत सापडलेल्या नोंदींची प्रमाणपत्रे देणे, मराठा समाजाला ओबीसीप्रमाणे सवलतींबाबत निर्णय लागू करणे, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आणि आंदोलनात बलिदान दिलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांच्या निधीचा प्रश्न सोडविण्याची मागणी केली आहे.

## ५ सप्टेंबरचा दिल्ली मोर्चा; सरकारसमोर पुन्हा मोठी परीक्षाआंदोलन हाताळणार कसे?

### सीजेपीचा महामोर्चा जाहीर; विद्यार्थ्यांच्या मागण्या, एफआयआर आणि पोलिस कारवाईचे आरोप केंद्रासाठी कायदा–सुव्यवस्था आणि विश्वासाचे दुहेरी आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

सरकारने २५ जुलै रोजी दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण झालेली नाहीत, असा आरोप करत ‘कॉकरोज जनता पार्टी’ने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत शांततापूर्ण महामोर्चाची घोषणा केली आहे. इंडिया गेटपासून नवी दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत प्रस्तावित या मोर्चात नीट परीक्षेतील कथित गैरप्रकारांचे पीडित विद्यार्थी, त्यांचे कुटुंबीय तसेच पोलिस कारवाईचे बळी ठरल्याचा दावा करणारे नागरिक सहभागी होणार असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

मोर्चाची घोषणा सरकारसाठी केवळ कायदा–सुव्यवस्थेचे आव्हान नाही; विद्यार्थ्यांच्या तक्रारी किती गांभीर्याने घेतल्या जातात आणि सरकार आपल्या आश्वासनांची अंमलबजावणी किती पारदर्शकपणे करते, याचीही परीक्षा आहे.

सीजेपीच्या दाव्यानुसार, १८ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने एफआयआरची यादी मागितली असतानाही सरकारकडून याबाबत स्पष्ट भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे न्यायाच्या मागणीसाठी मोर्चा काढण्यात येणार असल्याचे संघटनेने म्हटले आहे.

दरम्यान, विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलिस हिंसाचाराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी महिला आंदोलनकर्त्यांनी केलेल्या लैंगिक अत्याचाराच्या तक्रारींची चौकशी प्राधान्याने करण्याचे निर्देश दिल्याचे वृत्त आहे. या तक्रारींवर अंतरिम अहवाल लवकर सादर करण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

सरकारसमोर तीन मोठे प्रश्न

५ सप्टेंबरपूर्वी केंद्र सरकारसमोर सर्वप्रथम संवादाचा मार्ग खुला ठेवण्याचे आव्हान असेल. आंदोलनकर्त्यांना केवळ कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न मानून पोलिसी पद्धतीने हाताळण्यापेक्षा त्यांच्या तक्रारींवर अधिकृत आणि स्पष्ट संवाद होणे आवश्यक आहे.

दुसरे आव्हान म्हणजे एफआयआर आणि चौकशी प्रक्रियेतील पारदर्शकता. कोणत्या प्रकरणांत एफआयआर दाखल झाले, कोणत्या तक्रारींची चौकशी सुरू आहे आणि कोणत्या प्रकरणांत कायदेशीर अडचणी आहेत, याची स्पष्ट माहिती दिल्यास संशयाचे वातावरण कमी होऊ शकते.

तिसरे आणि सर्वांत संवेदनशील आव्हान म्हणजे महिला आंदोलनकर्त्यांच्या लैंगिक अत्याचाराच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी. या तक्रारी गंभीर असल्याने कोणत्याही राजकीय दबावापासून स्वतंत्र, वेळबद्ध आणि विश्वासार्ह चौकशी होणे आवश्यक आहे.

पोलिस बंदोबस्त की संवादाचा मार्ग?

मोठ्या आंदोलनापूर्वी पोलिस बंदोबस्त वाढवणे स्वाभाविक असले तरी, सरकारची खरी कसोटी आंदोलन किती पोलिसांच्या माध्यमातून नियंत्रित केले यामध्ये नसून ते किती शांततेत आणि संवादातून हाताळले, यामध्ये असेल.

सरकारने आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांवर ठोस भूमिका स्पष्ट केली, न्यायालयीन प्रक्रियेत सहकार्य केले आणि चौकशीबाबत पारदर्शकता ठेवली, तर तणाव कमी होऊ शकतो. उलट, मागण्यांकडे दुर्लक्ष झाले किंवा आंदोलनावर अनावश्यक निर्बंध लादले गेले, तर प्रश्न अधिक राजकीय रंग घेण्याची शक्यता आहे.

५ सप्टेंबरचा मोर्चा केंद्र सरकारसाठी केवळ एक दिवसाचा कायदा–सुव्यवस्थेचा विषय नाही; तो सरकारच्या संवादक्षमतेची, प्रशासनाच्या पारदर्शकतेची आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांबाबतच्या संवेदनशीलतेची परीक्षा ठरणार आहे.

सरकार हा मोर्चा ‘दडपणार’ की ‘ऐकणार’? यावर पुढील राजकीय वातावरण मोठ्या प्रमाणात अवलंबून राहू शकते.

## संपादकीय

### शिक्षणव्यवस्थेचा आरसा सरकारच्या चेहऱ्यावर

देशाचे भवितव्य संसदेतल्या भाषणांत किंवा मंत्रालयांच्या फाईलमध्ये घडत नाही; ते घडते शाळेच्या वर्गखोलीत. आज बाकावर बसलेले मूल उद्याचा नागरिक, वैज्ञानिक, शिक्षक, उद्योजक किंवा लोकप्रतिनिधी होणार आहे. त्यामुळे देशातील शालेय शिक्षणव्यवस्था किती मजबूत आहे, यावरच भारताच्या भवितव्याची दिशा ठरणार आहे. अशा वेळी नीती आयोगाचा २०२६ मधील **School Education System in India: Temporal Analysis and Policy Roadmap for Quality Enhancement** हा अहवाल सरकारच्या शिक्षणविषयक दाव्यांसमोर एक अस्वस्थ करणारा आरसा उभा करतो. भारताकडे जगातील सर्वात मोठ्या शालेय शिक्षणव्यवस्थांपैकी एक व्यवस्था आहे. **UDISE+ 2024-25** नुसार देशात १४.७१ लाखांहून अधिक शाळा, २४.६९ कोटी विद्यार्थी आणि सुमारे १.०१ कोटी शिक्षक आहेत. गेल्या दशकात वीज, इंटरनेट, संगणक, डिजिटल सुविधा यामध्ये लक्षणीय वाढ झाली. २०१४-१५ मध्ये ५५.९६ टक्के शाळांमध्ये कार्यरत वीज होती; २०२४-२५ मध्ये हा आकडा ९१.९ टक्क्यांवर पोहोचला. इंटरनेट सुविधा ८.०५ टक्क्यांवरून ६३.५ टक्क्यांपर्यंत वाढली. ही प्रगती निश्चितच स्वागतार्ह आहे. पण इथेच शिक्षणव्यवस्थेचा खरा प्रश्न उभा राहतोशाळेत वीज आली, इंटरनेट आलं, संगणक आला; पण मुलं खरंच शिकली का? हा प्रश्न विचारण्याचं कारण म्हणजे मूलभूत शिक्षणाच्या गुणवत्तेचं चित्र. अहवालातील विश्लेषणानुसार दुसरीच्या पातळीवरील मजकूर वाचू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचं प्रमाण २०१४ मधील ७४.७ टक्क्यांवरून २०२४ मध्ये ७१.१ टक्क्यांवर आलं. सरकारी शाळांमध्ये ही घसरण ७१.५ टक्क्यांवरून ६७.५ टक्क्यांपर्यंत आहे. म्हणजे पायाभूत सुविधा वाढत असताना मूलभूत वाचन क्षमतेचा आलेख अपेक्षेप्रमाणे वर गेलेला नाही. गणिताची स्थितीही फार वेगळी नाही. तिसरीच्या विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत वजाबाकी सोडवू शकणाऱ्यांचं प्रमाण अजूनही अपेक्षित पातळीपासून दूर आहे. याचा अर्थ स्पष्ट आहेशाळेत प्रवेश वाढवणे ही शिक्षणव्यवस्थेची अंतिम कामगिरी नाही; शाळेत गेल्यानंतर मुलं काय शिकतात, ही खरी कसोटी आहे. याहून गंभीर बाब म्हणजे सरकारी शाळांवरील घटता विश्वास. २००५ मध्ये देशातील एकूण विद्यार्थ्यांपैकी सुमारे ७१ टक्के विद्यार्थी सरकारी शाळांमध्ये होते. २०२४-२५ मध्ये हा वाटा ४९.२४ टक्क्यांवर आला. दशकभराच्या **UDISE+** तुलनेतही सरकारी शाळांमधील विद्यार्थीवाटा २०१४-१५ मधील ५४.३ टक्क्यांवरून सुमारे ४९.२५ टक्क्यांवर आला, तर खासगी शाळांचा वाटा ३१.७ टक्क्यांवरून ३८.८ टक्क्यांपर्यंत वाढला. हा केवळ आकड्यांचा बदल नाही. हा पालकांच्या विश्वासाचा प्रश्न आहे. सरकारी शाळांची संख्या २०१४-१५ मधील सुमारे ११.०७ लाखांवरून २०२४-२५ मध्ये १०.१३ लाखांपर्यंत घटली. शाळांचे **consolidation** आणि **rationalisation** यामागे असू शकते; परंतु या प्रक्रियेत ग्रामीण, दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाच्या संधींवर परिणाम होत नाही ना, याचीही सरकारने तपासणी करणे आवश्यक आहे. खासगी शाळांकडे पालकांचा वाढता कल हा केवळ इंग्रजी माध्यमाचा मोह नाही. शिस्त, रोजगाराच्या संधी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा यामागे आहे. मात्र खासगी शिक्षणालाही गुणवत्ता हमीचे प्रमाणपत्र देता येणार नाही. कमी शुल्काच्या खासगी शाळांमध्येही मूलभूत वाचन आणि गणित कौशल्यांमध्ये मोठी कमतरता असल्याचं अहवालातील आकडेवारी दाखवते. त्यामुळे प्रश्न सरकारी विरुद्ध खासगी असा नसून दर्जेदार शिक्षण विरुद्ध अपुरी गुणवत्ता असा आहे. शिक्षकांच्या रिक्त जागा हा या संकटाचा आणखी एक केंद्रबिंदू आहे. देशभरात शिक्षकांची संख्या मोठी असली तरी अनेक राज्यांमध्ये हजारो पदे रिक्त आहेत. त्याहून गंभीर म्हणजे एकाच शिक्षकावर चालणाऱ्या शाळांची संख्या मोठी आहे. एका शिक्षकाने अनेक वर्ग, अनेक विषय, प्रशासकीय कामं आणि सरकारी योजनांची अंमलबजावणी सांभाळायची, ही अपेक्षा शिक्षणाच्या गुणवत्तेला कितपत न्याय देणार? शिक्षकांना दोष देणं सोपं आहे; पण शिक्षकांना आवश्यक मनुष्यबळ, प्रशिक्षण आणि संसाधनं न देता गुणवत्तेची अपेक्षा करणं ही व्यवस्थेची जबाबदारी झटकण्याची पद्धत आहे. तरीही या चित्रात आशेचे किरण आहेत. विद्यार्थ्यांच्या संक्रमण दरात सुधारणा झाली आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील सकल प्रवेश दरही वाढला आहे. पायाभूत सुविधांमध्ये मोठी प्रगती झाली आहे. म्हणजे सरकारच्या प्रयत्नांना नाकारता येणार नाही. पण आता शिक्षण धोरणांचा पुढचा टप्पा सुरू करण्याची वेळ आली आहे. आतापर्यंत प्रश्न होताशाळा आहे का? आता प्रश्न असायला हवाशाळेत शिक्षण आहे का? राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, समग्र शिक्षा, निपुण भारत यांसारख्या योजनांचा खरा परिणाम वर्गखोलीत दिसला पाहिजे. डिजिटल बोर्ड, इंटरनेट आणि स्मार्ट क्लासरूम हे शिक्षणाचे साधन आहेत; ते स्वतः शिक्षणाची गुणवत्ता नाहीत. सरकारने मूलभूत साक्षरता, अंकगणित, शिक्षकांची उपलब्धता, शाळा सोडण्याचे प्रमाण आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. नीती आयोगाने **school complexes, school clusters,** शाळा व्यवस्थापन समित्यांचे सक्षमीकरण, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, मूलभूत साक्षरता-अंकगणित, व्यावसायिक कौशल्ये आणि मानसिक आरोग्य यावर भर दिला आहे. आता गरज आहे ती या शिफारशी कागदावर न ठेवता वेळबद्ध कृती आराखड्यात रूपांतरित करण्याची. कारण शिक्षण हा केवळ अर्थसंकल्पातील एक विभाग नाही. तो सामाजिक न्यायाचा पाया आहे. श्रीमंत कुटुंबातील मुलाला दर्जेदार शिक्षणाची अनेक दारे उपलब्ध असतात; पण गरीब कुटुंबातील मुलासाठी सरकारी शाळा हीच अनेकदा भविष्यात जाण्याची सर्वात मोठी संधी असते. त्यामुळे सरकारी शाळा कमकुवत होणे म्हणजे केवळ एका संस्थेची अधोगती नव्हे; तो सामाजिक विषमता वाढण्याचा धोका आहे. आज सरकारने स्वतःला काही कठोर प्रश्न विचारण्याची वेळ आली आहेसरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांचा वाटा का घटतो आहे? शिक्षकांच्या रिक्त जागा कधी भरल्या जाणार? एकाच शिक्षकावर चालणाऱ्या शाळांचा प्रश्न कधी संपणार? प्रत्येक मुलाला त्याच्या इयत्तेनुसार वाचता, लिहिता आणि गणित करता येण्यासाठी निश्चित कालमर्यादेचा कार्यक्रम कधी तयार होणार? शिक्षणव्यवस्थेचा आरसा सरकारसमोर आहे. त्यात फक्त वाढलेल्या शाळा, वाढलेली वीज आणि वाढलेलं इंटरनेट दिसत नाही; त्यात अजूनही शिकण्यासाठी धडपडणाऱ्या मुलांचे चेहरे दिसतात.

म्हणून शिक्षणाच्या यशाची मोजणी आता इमारतींच्या संख्येने, स्मार्ट क्लासरूमच्या उद्घाटनांनी किंवा डिजिटल सुविधांच्या आकड्यांनी होऊ नये. खरी मोजणी एका साध्या प्रश्नाने झाली पाहिजेवर्गखोलीत बसलेलं मूल खरंच शिकतंय का?

कारण देशाची खरी प्रगती मंत्रालयाच्या अहवालात नव्हे, तर सरकारी शाळेतील एका मुलाला पुस्तक समजून वाचता येते, गणिताची समस्या सोडवता येते आणि आत्मविश्वासाने भविष्याकडे पाहता येते, त्या क्षणी दिसली पाहिजे.

नीती आयोगाचा अहवाल म्हणूनच अभिनंदनाचा दस्तऐवज नसून आत्मपरीक्षणाचा आरसा आहे. आता हा आरसा पाहायचा की फोडायचा, याचा निर्णय सरकारला घ्यायचा आहे.

# जिल्हा रुग्णालयातून 'सुपर स्पेशालिटी' आरोग्यसेवेचे नवे पर्व; १०० खाटांचा क्रिटिकल केअर ब्लॉक महिनाभरात कार्यान्वित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयाचा विस्तार करून अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या स्वरूपात विकसित करण्याच्या कामांना गती देण्यात येत असून, रुग्णालयातील १०० खाटांचा 'क्रिटिकल केअर ब्लॉक' महिनाभरात कार्यान्वित करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत, अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली.

या सुविधेमुळे पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यातील नागरिकांना गंभीर आणि आपत्कालीन आजारांवर अत्याधुनिक उपचार एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत. एमआरआय, सीटी स्कॅन, एक्स-रे, बर्न वॉर्ड, एसएनसीयू, आयसीयू, दोन ऑपरेशन थिएटर तसेच अतिरिक्त आंतररुग्ण सुविधांमुळे जिल्हा रुग्णालयाच्या आरोग्यसेवेला मोठे बळ मिळणार आहे.

जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधा, अंतर्गत समस्या आणि प्रलंबित विकासकामांचा आमदार जगताप यांनी सोमवारी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत आढावा घेतला. यावेळी त्यांनी एमआरआय, सीटी स्कॅन आणि एक्स-रे युनिटची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या.

रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेता बाह्यरुग्ण विभागाची (ओपीडी) क्षमता वाढवावी. उपलब्ध मनुष्यबळ आणि वैद्यकीय उपकरणांचे योग्य नियोजन करून रुग्णांना सर्व सुविधा वेळेत मिळतील, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जगताप यांनी दिले.

रुग्णालयातील स्वच्छता, ड्रेनेज, पाणीपुरवठा, वीजपुरवठा,



अग्निसुरक्षा, औषध भांडार, प्रशासकीय कार्यालय, पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थेचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. बर्न वॉर्ड, एसएनसीयू विभाग, अतिरिक्त आंतररुग्ण कक्ष, एसटीपी व ईटीपी प्रकल्प, पोलिस मदत केंद्र तसेच रुग्णांच्या नातेवाइकांसाठी प्रतीक्षालयाची प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

लिफ्ट, 'पिंक टॉयलेट' आणि पोलिस गस्तीवर भर

रुग्णालयातील सर्व लिफ्ट नियमित व सुरक्षितपणे सुरू ठेवाव्यात. प्रतीक्षालयाचे अद्ययावतीकरण करून उद्यानातील सुविधा सुस्थितीत ठेवाव्यात. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेमार्फत सुरू असलेल्या स्थापत्यविषयक कामांची दैनंदिन देखरेख करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

महिलांसाठी रुग्णालय परिसरात आणि बाहेरील भागात 'पिंक टॉयलेट'ची सुविधा उपलब्ध करून द्यावी. बाहेरील अंडरपासमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि पुरेशी प्रकाशव्यवस्था कार्यान्वित ठेवावी. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहनांचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना वाहतूक पोलिसांना देण्यात आल्या.

रुग्णालय परिसरातील कचऱ्याची समस्या तातडीने दूर करणे, पोलिसांची गस्त वाढविणे तसेच भटकी कुत्री, मांजरे आणि इतर प्राण्यांमुळे रुग्ण व नातेवाइकांना त्रास होणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही देण्यात आले.

यावेळी नगरसेविका तृप्ती कांबळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उपायुक्त प्रदीप ठेंगल, सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भाग्यश्री थोपटे, उरो रुग्णालय अधीक्षक डॉ. अभिजीत होसमनी, अग्निशामक अधिकारी व्यंकटेश दुर्वास, उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, रुग्ण कल्याण समिती सदस्य डॉ. देविदास शेलार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित कामांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. जिल्हा रुग्णालय अधिक सक्षम, सुरक्षित, सुविधायुक्त आणि रुग्णाभिमुख करण्यासाठी आवश्यक कामांना गती देण्यात येत आहे. १०० खाटांचा क्रिटिकल केअर ब्लॉक लवकरात लवकर कार्यान्वित व्हावा, यासाठी प्रत्येक कामाचा नियमित पाठपुरावा केला जाईल, असे आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.

# महामार्गापलीकडील पुनावळेचा झपाट्याने विस्तार; नागरी सुविधांचा मात्र बोजवारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

महामार्गाच्या पलीकडे असलेला नवीन पुनावळे परिसर गेल्या काही वर्षांत झपाट्याने विकसित होत आहे. मोठमोठ्या गृहनिर्माण सोसायट्या, वाढती लोकसंख्या आणि नव्या वसाहतींमुळे परिसराचे रूप पालटले असले, तरी त्याच वेगाने नागरी सुविधा उभ्या राहिलेल्या नाहीत. उद्याने, खेळाची मैदाने, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळ्याची ठिकाणे, पदपथ, सार्वजनिक वाहतूक, स्ट्रीट लाईट, पाणी निचरा आणि वाहतूक व्यवस्थापन अशा मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

नवीन पुनावळे परिसरात लहान मुलांना खेळण्यासाठी सुसज्ज उद्याने नाहीत. ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्रे किंवा निवांत बसण्याची व्यवस्था नसल्याने त्यांचीही गैरसोय होत आहे. अनेक रस्त्यांवर सुरक्षित पदपथ नसल्यामुळे पादचाऱ्यांना वाहनांच्या गर्दीतून जीव धोक्यात घालून मार्गक्रमण करावे लागते.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची स्थितीही समाधानकारक नाही. सध्या गायकवाडनगरपर्यंत महापालिकेची बससेवा उपलब्ध असली, तरी अनेक ठिकाणी अधिकृत बसथांबे नसल्याने प्रवाशांना बस कुठे थांबेल, याची निश्चित माहिती नसते. मुकाई चौक-रावेत आणि आकुर्डी रेल्वे स्थानक येथून सर्क्युलर बससेवा सुरू करण्याची मागणी होत आहे. अंडरपास आणि दोन्ही बाजूंच्या सेवा रस्त्यांचा वापर करून मिनीबस सेवा सुरू करावी, तसेच मेट्रो स्थानकांपर्यंत फिडर बससेवा उपलब्ध करून द्यावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

रिक्षा सेवाही नागरिकांच्या अडचणी वाढवणारी ठरत आहे. मीटरप्रमाणे धावणाऱ्या रिक्षांसाठी नियोजित रिक्षा स्टँड नसल्याने काही चालकांकडून मनमानी भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत. कमी अंतराच्या प्रवासासाठी नकार दिला जात असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांची विशेषतः गैरसोय होत आहे. पुनावळे गावठाणातील पोस्ट ऑफिसकडून अपेक्षित सेवा मिळत नसल्याचीही नागरिकांची तक्रार आहे. पत्रे आणि इतर टपाल वेळेवर वितरित होत नसल्याने वाढत्या लोकसंख्येचा विचार करून नवीन पुनावळे परिसरासाठी स्वतंत्र आणि आधुनिक पोस्ट ऑफिस सुरू करण्याची मागणी पुढे आली आहे. महामार्गालगतचा सेवा रस्ता सिमेंट काँक्रीटीकरणातून विकसित केला जात असला, तरी अद्याप पुरेशा प्रमाणात स्ट्रीट लाईटची व्यवस्था झालेली नाही. पावसाळ्यात पाणी साचू नये यासाठी प्रभावी स्टॉर्म वॉटर ड्रेनेज व्यवस्था उभारण्याची गरज आहे. महामार्ग आणि सेवा रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून परिसराचा पर्यावरणीय समतोल राखण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे. भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव हा आणखी एक गंभीर प्रश्न बनला आहे. दुचाकीस्वार, पादचारी, रिक्षाचालक आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असल्याने महापालिकेने यावर प्रभावी उपाययोजना करावी, अशी मागणी आहे. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना सलग संरक्षक कठडे उभारण्याचीही आवश्यकता आहे. काही ठिकाणी अनधिकृत पंक्चर दुकाने आणि इतर व्यवसाय उभे राहिल्याने वाहतूक सुरक्षेला धोका निर्माण होत आहे. आरएमसी मिक्सर आणि डंपरच्या अवजड वाहतुकीसाठी वेळेचे निर्बंध घालून वाहतूक व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध करण्याची मागणी होत आहे.

बाणेर, बालेवाडी, वारजे, कोथरूड आणि कात्रज येथून निगडी, चिंचवड, पिंपरीमार्गे देहूरोड, वडगाव, कामशेत आणि लोणावळ्याकडे जाणाऱ्या बससेवांनी प्रवाशांच्या सोयीसाठी सेवा रस्त्यांचा वापर करावा, याबाबत स्पष्ट नियोजन आवश्यक आहे. तसेच जांबे, नेरे, गहुंजे आणि किवळे मार्गावरील बससेवाही सेवा रस्त्यांचा वापर करतील, यासाठी संबंधित यंत्रणांनी योग्य नियोजन करावे, अशी मागणी आहे.

अंडरपास परिसरातील वाहतूक कोंडी हा नागरिकांसाठी रोजचा डोकेदुखीचा विषय बनला आहे. वाहतूक पोलिसांकडून नियंत्रण केले जात असले तरी अनेक वाहनचालक नियमांचे पालन करत नसल्याचे चित्र आहे. शनिवार-रविवार तसेच कार्यालयीन वेळेत कोंडी अधिक तीव्र होते. त्यामुळे अंडरपास परिसरात आधुनिक सिग्नल यंत्रणा उभारून वाहतुकीचे कायमस्वरूपी नियोजन करण्याची गरज आहे.

पुनावळेचा विकास केवळ गगनचुंबी इमारती आणि वाढत्या सोसायट्यांपुरता मर्यादित न राहता नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांसह व्हावा, अशी अपेक्षा स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. महापालिका, वाहतूक पोलीस आणि संबंधित शासकीय यंत्रणांनी समन्वयाने कृती आराखडा तयार करून या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणांवर कारवाईला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे आणि विनापरवाना टपऱ्यांवर कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी क्षेत्रनिहाय सर्वेक्षण करून निष्कासन मोहीम जलद गतीने राबविण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले. कारवाईत हलगर्जीपणा किंवा दिरंगाई आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि. २४) पिंपरी येथील महापालिका मुख्य प्रशासकीय भवनातील मधुकर पवळे सभागृहात अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवरील कारवाईचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. यावेळी बांधकाम परवानगी विभागाचे सह शहर अभियंता सुनील बागवानी, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षक उपस्थित होते.



बैठकीत सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील बीट निरीक्षकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक बीट निरीक्षकाने आपल्या कार्यक्षेत्राची नियमित पाहणी करून नव्याने सुरू झालेली तसेच सुरू असलेली अनधिकृत बांधकामे शोधून त्यांचे सर्वेक्षण करावे. सर्वेक्षणात आढळलेल्या अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार तातडीने निष्कासनाची कारवाई करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश सांडभोर यांनी दिले.

महापालिकेच्या मालकीच्या भूखंडांवरील अतिक्रमणे तसेच विनापरवाना टपऱ्यांवर प्राधान्याने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सार्वजनिक पदपथांवरील अतिक्रमणे हटवून ते नागरिकांसाठी मोकळे आणि वापरण्यायोग्य ठेवण्यावरही महापालिकेने भर दिला आहे.

केवळ नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्याची पद्धत न ठेवता अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःहून नियमित पाहणी करून अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे शोधावीत, असेही सांडभोर यांनी स्पष्ट केले.

संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात नियमित गस्त घालून परिस्थितीवर नियंत्रण ठेवावे, तसेच कारवाईसाठी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि नियोजन उपलब्ध करून घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाने आता तक्रार-आधारित कारवाईऐवजी नियमित सर्वेक्षण आणि प्रत्यक्ष पाहणीवर भर देण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आगामी काळात शहरातील अनधिकृत बांधकामे, टपऱ्या आणि सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणांविरोधातील कारवाईला अधिक वेग येण्याची शक्यता आहे.

# म्हाडाची ४ हजार ४६२ घरांची सोडत, १५ सप्टेंबरची मुदत, १३ ऑक्टोबरला जाहीर होणार सोडत

**पुणे :** पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडा) ४ हजार ४६२ घरांची सोडत जाहीर करण्यात आली असून अर्ज करण्यासाठी १५ सप्टेंबरची मुदत देण्यात आली आहे. सोडतीचा निकाल १३ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे. या सोडतीत २ हजार ९७१ घरे २० टक्के सर्वसमावेशक योजना तर १ हजार ४९१ घरे ही १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण योजनेतील आहेत. पुणे महापालिका क्षेत्रात यातील १ हजार ४६८ घरे आहेत. गेल्या दोन सोडतींमधील शिल्लक राहिलेल्या घरांची संख्या ५५८ इतकी आहे, अशी माहिती म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दिली.

ते पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, या योजनेत पुणे महापालिका क्षेत्रात १ हजार ४६८, पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात १ हजार ४०६ तर पीएमआरडीए क्षेत्रात १ हजार ५८८ घरे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. गेल्या दोन सोडतींमधील ५५८ शिल्लक राहिलेल्या घरांचाही या सोडतीत समावेश करण्यात आला आहे. सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा सोमवारपासून (दि. २४) उपलब्ध करून देण्यात आली असून १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहेत. ऑनलाइन अनामत रक्कम बँकेच्या आरटीजीएस आणि एनईएफटीद्वारे भरण्यासाठी १६ सप्टेंबरची मुदत देण्यात आली आहे. अर्जांची प्रारूप यादी २९ सप्टेंबर रोजी जाहीर करण्यात येणार असून त्यावर एक ऑक्टोबरपर्यंत दावे, हरकती दाखल करता येणार आहेत. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांची अंतिम यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून १३ ऑक्टोबर रोजी सोडतीचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती म्हाडाचे मुख्याधिकारी राहुल साकोरे यांनी दिली.

'ती' घरेही सोडतीद्वारेच

म्हाडाने यापूर्वी २९५ घरांची प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर सोडत काढली होती. मात्र, सोडतीच्या दिवशी एकाच वेळी हजारो अर्जदारांनी अर्ज केल्याने सर्व्हर बंद पडले होते. त्यानंतर ही सोडत आजतागायत काढण्यात आलेली नाही. याबाबत विचारले असता ते म्हणाले, अशी सुमारे ८०० ते १००० घरे असून आता ही घरेसुद्धा सोडतीद्वारे काढली जातील.यातील सामाजिक आरक्षण वगळता अन्य आरक्षणांमधील रिक्त घरे सामान्य श्रेणीत वर्ग करून ती सोडतीद्वारे काढण्यात येतील.

ताथवडे येथील म्हाडाच्या प्रकल्पातील साडेआठशे घरांपैकी अजूनही २५० घरे विक्रीविना पडून असल्याचे ते म्हणाले. यापूर्वी या घरांची किंमत कमी करण्यासंदर्भात विचार सुरू होता. मात्र, अद्याप याबाबत निर्णय घेतला नसल्याचे त्यांनी या वेळी स्पष्ट केले. दोन आठवड्यांपूर्वी गोखलेनगर येथील म्हाडाच्या वसाहतीमध्ये आढळराव यांनी संबंधित सदनिकाधारकांचा मेळावा आयोजित केला होता.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# आंबेगावच्या पूर्व भागात भुरट्या चोरांचा धुमाकूळ; आता वीजतारांवर डल्ला

## सारांश वृत्त

### थापेवाडीत १५० देशी रोपांची वृक्षलागवड; ग्रामस्थ व तरुणांचा पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी | प्रतिनिधी**

थापेवाडी (ता. शिरूर) : पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत थापेवाडी येथे ग्रामस्थ आणि तरुणांच्या पुढाकारातून सुमारे १५० ते १७५ देशी वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. लोणी-पाबळ मार्गावरील थापेवाडी फाटा ते थापेवाडी या रस्त्याच्या दुतर्फा ही वृक्षलागवड करण्यात आली.

रस्त्याच्या दुतर्फा देशी वृक्षांची लागवड झाल्याने भविष्यात या मार्गाचे सौंदर्य वाढण्याबरोबरच परिसरातील पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होणार आहे. वृक्षलागवडीनंतर केवळ रोपे लावणे महत्त्वाचे नसून त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणेही तितकेच गरजेचे असल्याचे ग्रामस्थांनी यावेळी नमूद केले. या उपक्रमासाठी शिरूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी निलकंठ गव्हाणे, हनुमंत गव्हाणे, ज्ञानेश्वर गव्हाणे, केशव गव्हाणे, सतीश रंगनाथ गव्हाणे, सुशांत गव्हाणे, कैलास मोरे, तेजस मोरे, नंदकिशोर फंटागडे यांच्यासह ग्रामस्थांनी विशेष सहकार्य केले. लागवड करण्यात आलेल्या सर्व रोपांचे नियमित जतन, पाणीपुरवठा आणि संवर्धन करण्याची जबाबदारी ग्रामस्थ व तरुण वर्गाने स्वीकारली.

---

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी | प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात डिझेल चोरीनंतर आता भुरट्या चोरांनी आपला मोर्चा वीजतारांकडे वळविल्याचे समोर आले आहे. वीजपोलवरील हायटेंशन वीजतारा चोरून नेल्याने वीजकाम करणाऱ्या ठेकेदारांचे मोठे नुकसान झाले असून, परिसरातील ग्रामस्थांमध्येही चिंता व्यक्त होत आहे. एका बाजूला वनविभागाच्या परवानग्या आणि अडचणी, तर दुसऱ्या बाजूला चोरट्यांचा उपद्रव; अशा परिस्थितीत विकासकामे करायची तरी कशी, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लोणी येथील वीज उपकेंद्रातून मांदळेवाडी (ता. आंबेगाव) येथे वीजपुरवठा करण्याचे काम सुरू आहे. यासाठी वडगावपीर येथील बैलगाडा घाटापासून ढगेवस्तीपर्यंत वीजपोल उभारण्यात आले आहेत. या पोलवरून हायटेंशन वीजतारा ओढण्याचे काम अंतिम टप्प्यात आले होते. लवकरच मांदळेवाडी परिसरातील वीजपुरवठा सुरळीत होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

मात्र, शनिवारी (दि. २२) मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी या परिसरातील जवळपास दहा वीजपोलवरील वीजतारा काढून चोरून नेल्याचे उघडकीस आले. त्यामुळे वीज कंत्राटदाराचे मोठे महावितरणसह संबंधित आर्थिक नुकसान झाले असून, वीजपुरवठा सुरू करण्याच्या कामालाही मोठा अडथळा निर्माण झाला आहे.



याबाबत सरपंच उज्वला आढक आणि उपसरपंच रवि ढगे पाटील यांनी सांगितले की, वीजतारा ओढण्याचे काम अंतिम टप्प्यात आले होते. लवकरच लोणी येथून मांदळेवाडीला वीजपुरवठा सुरू होणार होता. मात्र, चोरट्यांनी वीजतारा चोरून नेल्याने संपूर्ण काम पुन्हा रखडले आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात रात्रीच्या वेळी सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वीजतारा तसेच इतर सार्वजनिक मालमत्तेची चोरी करणाऱ्या चोरट्यांचा पोलिसांनी तातडीने शोध घेऊन बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन चोरट्यांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

## धामणीत श्रीकृष्ण जन्मोत्सव शताब्दी महोत्सवाची धर्मध्वज उभारणीने मंगलमय सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

धामणी (ता. आंबेगाव), दि. २४ ऑगस्ट २०२६ : धामणी गावातील श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या शताब्दी महोत्सवाला सोमवारी धर्मध्वज उभारणीच्या मंगल सोहळ्याने भक्तिमय वातावरणात उत्साहात सुरुवात झाली. शंभर वर्षांची परंपरा लाभलेल्या या जन्मोत्सवाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित सोहळ्यास वारकरी संप्रदायातील संत-महंत, वारकरी, भाविक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वारकरी संप्रदायाचे ह.भ.प. विष्णू महाराज केंद्रे, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे दहावे वंशज ह.भ.प. माणिक महाराज मोरे तसेच आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर माऊली दिंडी सोहळ्याचे चोपदार राजाभाऊ चोपदार यांच्या प्रमुख उपस्थितीत धर्मध्वजाचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर मंत्रोच्चार आणि भक्तिमय वातावरणात धर्मध्वज उभारण्यात आला.

धर्मध्वज फडकविण्यात आल्यानंतर उपस्थित भाविकांनी 'श्रीकृष्ण भगवान की जय', 'ज्ञानोबा-तुकाराम' तसेच विठ्ठल नामाचा जयघोष केला. टाळ-मृदंगाच्या गजराने आणि हरिनामाच्या घोषाने संपूर्ण धामणी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली.

श्रीकृष्ण जन्मोत्सवाला धामणी गावात शंभर वर्षांची अखंड परंपरा लाभली आहे. त्यामुळे यंदाचा शताब्दी महोत्सव ग्रामस्थांसाठी विशेष महत्त्वाचा ठरला आहे. धर्मध्वज उभारणीने या ऐतिहासिक महोत्सवाला औपचारिक सुरुवात झाली असून, आगामी काळात विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

शताब्दी महोत्सवाच्या माध्यमातून धामणी गावातील श्रीकृष्ण जन्मोत्सवाची परंपरा, वारकरी संप्रदायाची संस्कृती आणि अध्यात्मिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न होणार आहे. या महोत्सवात परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होण्याची अपेक्षा आहे.

धर्मध्वज उभारणीच्या सोहळ्यास ग्रामस्थ, वारकरी, भाविक आणि युवकांची लक्षणीय उपस्थिती होती. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे धामणी गावात शताब्दी महोत्सवाचा उत्साह संचारला असून, पुढील धार्मिक कार्यक्रमांकडे ग्रामस्थ आणि भाविकांचे लक्ष लागले आहे.

---

## शालेय पोषण आहार; एफएसएसआय परवाना सक्तीचा, पण मार्गदर्शनाअभावी मुख्याध्यापक संभ्रमात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

शाळेत विद्यार्थ्यांना दिले जाणारे पोषण आहारातील अन्न सुरक्षित आणि पौष्टिक असावे, यासाठी आता शाळांची एफएसएसएआयकडे नोंदणी करून परवाना घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, हा परवाना नेमका कसा काढायचा? कोणाच्या नावाने नोंदणी करायची आणि कोणती माहिती भरायची, याबाबत स्पष्ट मार्गदर्शन नसल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील मुख्याध्यापक गोंधळात पडले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाच्या आदेशानंतर शाळांना फोसकॉस पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अनेक ठिकाणी तातडीने परवाना काढून अहवाल देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. मात्र, ग्रामीण आणि शहरी शाळांची परिस्थिती वेगळी असल्याने नोंदणीचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये पोषण आहार शाळेतच शिजविला जातो. तर शहरातील काही शाळांना तयार अन्न केंद्रीय स्वयंपाकगृहातून मिळते. त्यामुळे या दोन्ही प्रकारच्या शाळांनी कोणत्या प्रकारची नोंदणी करावी, याबाबत स्पष्ट सूचना मिळालेल्या नाहीत.

नोंदणी करताना अर्जदार म्हणून मुख्याध्यापकांचे नाव द्यायचे की शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांचे, याबाबतही संभ्रम आहे. काही ठिकाणी मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक नावाने, तर काही ठिकाणी स्वयंपाक करणाऱ्या व्यक्तीच्या नावाने परवाना काढण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. मुख्याध्यापकांची बदली झाली किंवा ते निवृत्त झाले, तर त्यांच्या नावावरील परवान्याचे काय होणार, असा प्रश्न शिक्षकांनी उपस्थित केला आहे. काही शाळांमध्ये नियमित मुख्याध्यापकच नसताना नोंदणीची जबाबदारी कोण घेणार, हाही प्रश्न कायम आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने या सर्व बाबींबाबत शासनाकडे स्पष्ट आणि लेखी मार्गदर्शन करण्याची मागणी केली आहे. जिल्हा व तालुका स्तरावर मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन शंका दूर कराव्यात, असे समितीचे म्हणणे आहे. मुलांना सुरक्षित अन्न मिळावे, याला शिक्षकांचा विरोध नाही. मात्र, परवाना काढण्यापूर्वी योग्य माहिती आणि मार्गदर्शन मिळावे, एवढीच मुख्याध्यापकांची अपेक्षा आहे.

विद्यार्थ्यांना पौष्टिक, संतुलित व सुरक्षित आहार मिळण्यासाठी एफएसएसएआय नोंदणी शाळांनी करायची आहे. मात्र त्या संबंधाने मुख्याध्यापकांना परिपूर्ण माहिती देण्यासह शाळांना आवश्यक सुविधा देणे गरजेचे आहे.- विजय कोंबे, राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

---

## श्रावणी सोमवारी 'हर हर महादेव'चा जयघोष; भीमाशंकरला लाखो भाविकांची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

ॐ नमः शिवाय हर हर महादेवच्या जयघोषाने आणि पंचामृत पूजेसह मंत्रघोषाच्या मंगलमय वातावरणात श्री क्षेत्र भीमाशंकर दुसऱ्या श्रावणी सोमवारी लाखो भाविकांनी गजबजून गेले. राज्याच्या विविध भागांसह परराज्यातून आलेल्या भाविकांनी पवित्र शिवलिंगाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली. संततधार पाऊस, दाट धुके आणि हिरवाईने नटलेला निसर्ग यामुळे भीमाशंकर परिसरातील भक्तिमय वातावरणाला आणखीच उधाण आले.





दुसऱ्या श्रावणी सोमवारी भीमाशंकर मंदिरातील दर्शनरांग तब्बल तीन किलोमीटरपेक्षा अधिक लांब गेली होती. संततधार पावसाची पर्वा न करता भाविक दर्शनासाठी रांगेत उभे होते. दर्शनासाठी भाविकांना तब्बल पाच ते सहा तास प्रतीक्षा करावी लागत होती. पुणे, मुंबई, नगर आणि नाशिक परिसरातून आलेल्या भाविकांची संख्या मोठी होती.

शनिवार-रविवारच्या सुट्टीमुळेही भीमाशंकर परिसरात मोठी गर्दी झाली होती. रात्री मुक्कामासाठी आलेल्या भाविकांमुळे परिसरातील हॉटेल्स आणि लॉज पूर्णपणे भरून गेले होते. मुक्कामाची व्यवस्था न झालेल्या काही भाविकांनी मध्यरात्रीपासूनच दर्शनरांगेत थांबण्यास सुरुवात केली.

नियमानुसार पहाटे श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात देवस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त तसेच गुरव-पुजारी यांच्या हस्ते महापूजा व आरती पार पडली. महापूजा आणि आरतीनंतर झालेल्या सुमधुर शंखनादाने संपूर्ण भीमाशंकर परिसर दुमदुमून गेला. त्यानंतर मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले.

दरम्यान, भीमाशंकरकडे येताना पोखरी घाटातून दिसणारे डिंभे धरणाचे विहंगम दृश्य पर्यटकांना आकर्षित करत आहे. रस्त्यालगत आदिवासी बांधवांच्या भातखाचरांमध्ये सुरू असलेली भाताची आवणी पाहण्यासाठी तसेच त्याचे छायाचित्रण करण्यासाठीही पर्यटक मोठ्या संख्येने थांबत आहेत. पावसाळ्यातील हिरवाई आणि धुक्यामुळे या परिसराचे निसर्गसौंदर्य पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

भाविक व पर्यटकांच्या वाढत्या गर्दीमुळे वाहतूक कोंडी होऊ नये आणि गर्दीवर नियंत्रण राहावे, यासाठी घोडेगाव पोलीस ठाण्याच्या वतीने चार वाहनतळांवर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मंदिर परिसरातही भीमाशंकर देवस्थानच्या वतीने भाविकांना जलद आणि सुलभ दर्शन मिळावे, यासाठी नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली होती.

---

## पुणे शिक्षक मतदारसंघाचा आमदार विवेकानंद संस्था ठरवेल : चंद्रकांत पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने विक्रमी मतदार नोंदणी केल्यास पुणे शिक्षक मतदारसंघाचा आमदार संस्था ठरवेल, असा विश्वास उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला.

विवेकानंद कॉलेजच्या शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे आयोजित शिक्षक व पदवीधर मतदार नोंदणी मेळाव्यात ते बोलत होते. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या नेतृत्वाखाली मतदार नोंदणीचे काम सुरू असून, यावेळी साडेपाच हजार नवीन मतदार नोंदणी अर्ज चंद्रकांत पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

शिक्षकांच्या प्रश्नांवर सरकार सकारात्मक असून साडेपाच हजार प्राध्यापकांची भरती, मुलींना व्यावसायिक शिक्षणात पूर्ण फी माफी आणि शिक्षकेतर कर्मचारी भरतीवरील बंदी उठविण्यासह विविध निर्णय घेतल्याचे पाटील यांनी सांगितले. २००५ पूर्वी सेवेत असलेल्या शिक्षकांना विनाअट जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे कौस्तुभ गावडे यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, शेखर इनामदार यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पदवीधर मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. सुप्रिया पाटील आणि डॉ. कविता तिवडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अशोक पाटील-पोहाळेकर यांनी आभार मानले. मित्र पदवीधर संघाचे माणिक पाटील-चुयेकर, नितीन पाटील, हितेंद्र साळुंखे उपस्थित होते.

---

## चाकणच्या खड्ड्यांवर राजकीय 'राडा'; नेते मैदानात, M-60 फॉर्म्युल्याची चर्चा

### रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडीवरून राजकीय वातावरण तापले; एकनाथ शिंदेंची पाहणी, पालकमंत्री सुनेत्रा पवारांच्या दौऱ्याला विलंब का? चाकणकरांचा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी प्रतिनिधी**

चाकण एमआयडीसीतील खड्डे, खराब रस्ते आणि दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली वाहतूक कोंडी यावरून आता राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. रस्त्यांच्या दुरवस्थेवरून आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच नेत्यांकडून प्रत्यक्ष पाहणी दौरे आणि रस्ते दुरुस्तीच्या पर्यायांवर चर्चा सुरू झाली आहे. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चाकण परिसरातील रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी केल्याने या प्रश्नाला पुन्हा राजकीय रंग आला आहे.

चाकण एमआयडीसी हा राज्यातील महत्त्वाच्या औद्योगिक पट्ट्यांपैकी एक आहे. मोठ्या प्रमाणावर उद्योग, मालवाहतूक करणारे ट्रक, कंटेनर आणि अवजड वाहनांची सतत वर्दळ असलेल्या या परिसरातील रस्त्यांची अवस्था मात्र चिंताजनक आहे. अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना अक्षरशः कसरत करावी लागत आहे. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने त्यांचा अंदाज न आल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे वाहतुकीचा वेग मंदावून चाकण परिसरात वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. औद्योगिक क्षेत्रातून होणारी मालवाहतूक आणि स्थानिक वाहतूक यांचा ताण रस्त्यांवर वाढल्याने नागरिक तसेच कामगारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे केवळ तात्पुरती डागडुजी न करता टिकाऊ पद्धतीने रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, रस्ते दुरुस्तीसाठी च्-६० प्रीकास्ट कॉंक्रीट फॉर्म्युला चर्चेत आला आहे. अवजड वाहतूक असलेल्या रस्त्यांवर टिकाऊपणा वाढविण्यासाठी अशा तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा पर्याय पुढे येत असल्याने चाकणच्या रस्त्यांसाठी हा फॉर्म्युला प्रत्यक्षात कितपत प्रभावी ठरेल, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. मात्र, या उपाययोजनेची अंमलबजावणी कधी आणि कोणत्या रस्त्यांवर होणार, याबाबत अद्याप स्पष्टता आवश्यक आहे.



एकनाथ शिंदे यांच्या प्रत्यक्ष पाहणीमुळे रस्त्यांच्या प्रश्नाला राजकीय पातळीवरही महत्त्व प्राप्त झाले आहे. दुसरीकडे पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून चाकण परिसरातील परिस्थितीची पाहणी होणार असल्याची चर्चा असतानाच त्यांच्या पाहणी दौऱ्याला विलंब का होत आहे, असा सवाल चाकणकरांकडून उपस्थित केला जात आहे.

नेते पाहणीला येतात, आश्वासने दिली जातात; मग रस्ते कधी सुधारणार? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून उपस्थित होत आहे. उद्योगांसाठी महत्त्वाचा असलेल्या चाकण एमआयडीसीतील रस्त्यांची अवस्था सुधारण्यासाठी शासन, स्थानिक प्रशासन आणि औद्योगिक विकास यंत्रणांनी एकत्रितपणे ठोस निर्णय घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

चाकणच्या रस्त्यांचा प्रश्न आता केवळ खड्ड्यांपुरता राहिलेला नसून तो वाहतूक, उद्योग, कामगारांची सुरक्षितता आणि स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न बनला आहे. त्यामुळे पाहणी दौरे आणि राजकीय आरोप-प्रत्यारोपांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष कामाला कधी सुरुवात होते,

## सारांश वृत्त

### भीमाशंकरला 'व्हीआयपी' दर्शनावरून हुज्जत: 'वाद नव्हे, भक्ती व्हायरल करा'; मोबाईल चित्रीकरणावर बंदीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
भीमाशंकर : प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांची वाढती गर्दी, मर्यादित जागा आणि उपलब्ध सुविधांवर येणारा ताण यामुळे दर्शन व्यवस्था सुरळीत ठेवणे प्रशासनासाठी आव्हान ठरत आहे. दर्शनबारीत न थांबता तात्काळ दर्शन मिळावे, या मागणीवरून काही भाविकांकडून देवस्थान कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच पोलिसांशी वाद घातला जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. या वादांचे मोबाइलवर चित्रीकरण करून व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित होत असल्याने देवस्थानची प्रतिमा मलिन होत असल्याची भावना ग्रामस्थ आणि भाविकांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे मंदिर परिसरात मोबाइलवर फोटो काढणे आणि व्हिडिओ चित्रीकरणाबाबत स्पष्ट निर्बंध लागू करावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

श्रीक्षेत्र भीमाशंकर हे धार्मिक महत्त्वाबरोबरच निसर्गरम्य परिसरामुळे भाविक, पर्यटक आणि निसर्गप्रेमींचे आकर्षण आहे. वर्षभर मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात. मात्र, डोंगराळ आणि भौगोलिकदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थितीमुळे गर्दीच्या काळात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देताना प्रशासन व देवस्थान व्यवस्थापनास अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. दर्शन व्यवस्था नियंत्रित करण्यासाठी दर्शनबारी, सुरक्षा व्यवस्था आणि पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येतो. काही भाविक स्वतःला 'व्हीआयपी' समजून दर्शनबारीत न थांबता तात्काळ दर्शनाची मागणी करीत असल्याची तक्रार आहे. सुरक्षा रक्षक किंवा देवस्थान कर्मचाऱ्यांनी नियम समजावून सांगितल्यास त्यातून वाद निर्माण होतो. त्यानंतर वादाचे चित्रीकरण करून त्यातील काही भाग सोशल मीडियावर प्रसारित केला जात असल्याने संपूर्ण घटनेचे एकतर्फी चित्र समाजमाध्यमांवर उमटत असल्याची तक्रार स्थानिकांकडून करण्यात आली आहे.

# नॅशनल गेम्स, खेलो इंडिया आणि दिव्यांगांच्या सहा स्पर्धांचा रोख पारितोषिक योजनेत समावेश

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या पदक विजेत्यांच्या पारितोषिकात भरीव वाढ; मार्गदर्शकांनाही खेळाडूच्या बक्षिसाच्या १० टक्के रक्कम

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये पदक मिळविणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडू आणि त्यांच्या मार्गदर्शकांना देण्यात येणाऱ्या रोख पारितोषिक योजनेत मोठे बदल करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नॅशनल गेम्स, खेलो इंडिया, वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स तसेच दिव्यांगांच्या विविध स्पर्धांचा या योजनेत समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये पदक मिळविणाऱ्या खेळाडूंच्या पारितोषिक रकमेतही भरीव वाढ करण्यात आली आहे. सुवर्णपदकासाठी पूर्वीच्या पाच लाख रुपयांऐवजी सात लाख रुपये, रौप्यपदकासाठी तीन लाखांऐवजी पाच लाख रुपये, तर कांस्यपदकासाठी दीड लाखांऐवजी तीन लाख रुपये देण्यात येणार आहेत.

वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्समधील सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदक विजेत्यांना अनुक्रमे १० लाख, सात लाख आणि पाच लाख रुपये मिळणार आहेत. नॅशनल गेम्समध्ये अनुक्रमे सात लाख, पाच लाख आणि तीन लाख रुपये, तर खेलो इंडिया स्पर्धेतील पदक विजेत्यांना अनुक्रमे तीन लाख, दोन लाख आणि एक लाख रुपये पारितोषिक देण्यात येणार आहे.

### युथ ऑलिम्पिकच्या पारितोषिकात मोठी वाढ

युथ ऑलिम्पिक आणि युथ पॅरा ऑलिम्पिकमधील विजेत्यांच्या पारितोषिक रकमेतही मोठी वाढ करण्यात आली आहे. सुवर्णपदकासाठी २२.५० लाखांवरून ५० लाख रुपये, रौप्यपदकासाठी १५ लाखांवरून ३० लाख रुपये, तर कांस्यपदकासाठी ७.५० लाखांवरून २० लाख रुपये करण्यात आले आहेत.

### ग्रॅण्ड स्लॅम विजेत्यांना तीन कोटी

टेनिस, बॅडमिंटन आणि हॉकीसारख्या खेळांतील महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे. टेनिसच्या चारही ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धांतील विजेत्या खेळाडूला तीन कोटी रुपये, तर उपविजेत्याला दोन कोटी रुपये पारितोषिक मिळणार आहे.

बॅडमिंटनमधील थॉमस कप, उबेर कप आणि सुदीरमन कपच्या विजेत्यांना ४० लाख रुपये, तर उपविजेत्यांना २० लाख रुपये देण्यात येतील.

हॉकीतील अझलन शाह कप आणि चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्यांना ४० लाख रुपये, उपविजेत्यांना २० लाख रुपये, तर सुलतान जोहर कप (कनिष्ठ) विजेत्यांना २० लाख रुपये आणि उपविजेत्यांना १० लाख रुपये देण्यात येणार आहेत.

### मार्गदर्शकांनाही मिळणार बक्षीस

खेळाडूंच्या यशामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांसाठीही या योजनेत स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. खेळाडूला मिळणाऱ्या रोख पारितोषिकाच्या १० टक्के रक्कम मार्गदर्शकांना बक्षीस म्हणून दिली जाणार आहे. खेळाडूने प्रमाणित केलेल्या जास्तीत जास्त तीन मार्गदर्शकांमध्ये ही रक्कम विभागली जाईल.

यामध्ये प्राथमिक प्रशिक्षण देणाऱ्या मार्गदर्शकाला ३० टक्के, कौशल्य विकास करणाऱ्याला ३० टक्के आणि अंतिम व प्रगत प्रशिक्षण देणाऱ्या मार्गदर्शकाला ४० टक्के अशी विभागणी करण्यात आली आहे.

## खुर्चीसाठी भांडणाऱ्या दोन्ही गटांना भुजबळांनी फटकारलं ; लासलगाव बाजार समितीची निवडणूक दोन वेळा रद्द झाल्याने नाराज

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नाशिक | प्रतिनिधी

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या मतदारसंघात असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती -उपसभापती पदाची निवडणूक दोनदा स्थगित झाली आहे. बाजार समितीचा सत्तासंघर्ष शिगेला पोहचला असून संचालक मंडळाच्या दोन गटांत 'संगीत खुर्ची'चा खेळ सुरू आहे.

निवडणुकीच्या राजकीय गोंधळामुळे निवडणूक लांबणीवर पडली असून मंत्री छगन भुजबळांनी एका कार्यक्रमात आपल्या खास मिश्कील शैलीत बाजार समितीच्या संचालक मंडळाची चांगलीच हजेरी घेतली व कानउघडणी केली. साहेब, तुम्ही म्हणाल ते मान्य म्हणणारे आता कुठे गेले असा सवाल भुजबळांनी केला.

बाजार समितीत होळकर व थोरे अशा दोन्ही गटांत सभापती -उपसभापती पदासाठी रस्सीखेच सुरु असून भुजबळांनी दोन्ही गटाच्या संचालकांना खडेबोल सुनावले. 'आत्ताच सगळं का पाहिजे?' असा सवाल करत भुजबळांनी इच्छुकांच्या घाईला एकप्रकारे सबुरीचा सल्ला दिला.

खुर्चीपेक्षा बाजार समिती आणि शेतकऱ्यांचे हित महत्वाचे असल्याचे सांगत भुजबळांनी 'एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' असा मंत्र सांगितला. 'तुम्हाला काय करायचे ते करा, जेवढे भांडायचे तेवढे भांडा; पण शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही, एवढे लक्षात ठेवा, अशा इशाराच भुजबळांनी दोन्ही गटाच्या संचालकांना दिला.

दोन्ही गटांत सभापती कुणाला करायचं यावरुन वाद आहे, त्या पार्श्वभूमीवर राजकारणात थांबावे लागते, संधी येत जात राहतात. प्रत्येकाला कधी ना कधी संधी मिळते. आज एक सभापती, उद्या दुसरा, आज एका नावाची पाटी, उद्या दुसऱ्याची यात राजकारण संपत नाही, उलट सहकार्याने काम केले, तर संस्थेची प्रतिष्ठा वाढते. बाजार समितीच्या गेटवर येणारा शेतकरी कोणत्या गटाचा आहे, हे बघितले जात नाही, तर त्याच्या कांद्याला किती भाव मिळतो, त्याला किती सुविधा मिळतात आणि त्याच्या मालाचे नुकसान होते का, हेच त्याच्यासाठी महत्त्वाचे असते.

## अमरावतीच्या सरकारी रुग्णालयात नवजात बाळांचा आगीत मृत्यू; आरोग्यव्यवस्थेच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र
अमरावती | प्रतिनिधी

महाराष्ट्रातील अमरावती जिल्हा महिला रुग्णालयातील नवजात बालकांच्या विशेष उपचार कक्षाला पहाटेच्या सुमारास आग लागून तीन नवजात बाळांचा मृत्यू झाल्याने सरकारी रुग्णालयांमधील सुरक्षा व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ही दुर्घटना सोमवार, २४ ऑगस्ट रोजी पहाटे सुमारे ३.३० वाजता घडली. रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या नवजात शिशू विशेष उपचार कक्षात ही आग लागली. या कक्षात अकाली जन्मलेली आणि गंभीर प्रकृतीची नवजात बाळे उपचार घेत होती.

गडगेनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या माहितीनुसार, उपचार कक्षातील एका कृत्रिम श्वसनयंत्राचा स्फोट होऊन आग लागल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. आगीमध्ये तीन नवजात बाळांना गंभीर भाजल्या तसेच धुरामुळे श्वास गुदमरल्याने त्यांचा मृत्यू झाला.

आग लागल्यानंतर रुग्णालय प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले. प्रभावित कक्षातील सहा नवजात बाळांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. सुमारे १० ते १५ मिनिटांत आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र त्याआधीच तीन निष्पाप जीवांचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेनंतर रुग्णालयातील इतर नवजात बालकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी आपत्कालीन स्थलांतर करण्यात आले. दुर्घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि संबंधित प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या घटनेची संपूर्ण चौकशी सुरू असल्याचे सांगितले आहे. जखमी बालकांवर उपचार सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र या दुर्घटनेने काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. अतिगंभीर अवस्थेतील नवजात बाळांवर उपचार सुरू असलेल्या कक्षात अग्निसुरक्षा व्यवस्था किती सक्षम होती? कृत्रिम श्वसनयंत्राची नियमित तपासणी झाली होती का? आग लागल्यानंतर आपत्कालीन स्थलांतरासाठी आवश्यक व्यवस्था पुरेशी होती का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ही दुर्घटना टाळता आली असती का?

## बेरोजगारीचा स्फोट? ४० वर्षांतील उच्चांकाच्या दाव्याने सरकारसमोर नवा सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नागपूर : प्रतिनिधी

देशातील तरुणांच्या हातात पदवी आहे, पण नोकरी नाही; कौशल्य आहे, पण संधी नाही; आणि शिक्षण पूर्ण केल्यानंतरही भविष्याची हमी नाही. अशा परिस्थितीत तरुणांमधील अस्वस्थता आता राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे.

काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी वाड्रा यांनी २४ ऑगस्ट २०२६ रोजी नवी दिल्ली येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना देशातील बेरोजगारीचा दर गेल्या ४० वर्षांतील सर्वोच्च पातळीवर असल्याचा दावा केला. अलीकडील विद्यार्थी आंदोलनांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहू नये, तर त्यामागे अपयशी शिक्षणव्यवस्था आणि गेल्या १२ वर्षांत रोजगारनिर्मितीचा अभाव असल्याचे त्यांनी म्हटले.

नीती आयोगाच्या रोजगार आणि कौशल्यविषयक अहवालातूनही तरुणांच्या परिस्थितीबाबत गंभीर चित्र समोर आले आहे. अहवालानुसार, १५ ते २९ वयोगटातील सुमारे ८ कोटी ७० लाख तरुण शिक्षण, रोजगार किंवा प्रशिक्षण या तिन्हींपासून दूर आहेत. म्हणजेच हे तरुण ना शिक्षण घेत आहेत, ना नोकरी करत आहेत आणि ना कोणतेही कौशल्य प्रशिक्षण घेत आहेत.

या परिस्थितीमागे शिक्षण आणि रोजगार यांच्यातील मोठी दरी असल्याचेही अहवालातून दिसते. पदवी मिळाल्यानंतरही अनेक तरुणांना त्यांच्या शिक्षणाशी संबंधित रोजगार मिळत नाही. उपलब्ध आकडेवारीनुसार, केवळ ८.२५ टक्के पदवीधरांना त्यांच्या पात्रतेशी संबंधित रोजगार मिळतो.

सरकारी नोकऱ्यांसाठीची वाढती स्पर्धा हीदेखील रोजगाराच्या संकटाचे आणखी एक उदाहरण आहे. नोव्हेंबर २०२४ ते जुलै २०२५ या कालावधीत केवळ ५५ हजार पदांसाठी तब्बल १ कोटी ८६ लाख अर्ज प्राप्त झाले. एका जागेसाठी किती मोठ्या संख्येने तरुण स्पर्धा करत आहेत, हे या आकडेवारीतून स्पष्ट होते.

प्रियंका गांधी यांनी सरकारच्या आर्थिक धोरणांवरही प्रश्न उपस्थित केला. उत्पादन क्षेत्र, लघु आणि मध्यम उद्योग तसेच छोट्या व्यवसायांना पुरेसा आधार न मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याची क्षमता कमी झाल्याचा त्यांचा आरोप आहे.

मात्र येथे प्रश्न केवळ काँग्रेसच्या आरोपांचा किंवा सरकारच्या बचावाचा नाही. खरा प्रश्न आहेभारताची शिक्षणव्यवस्था तरुणांना रोजगारासाठी तयार करते आहे का? आणि अर्थव्यवस्था त्या तरुणांसाठी पुरेशा नोकऱ्या निर्माण करते आहे का?

कारण तरुणांना वर्षानुवर्षे शिक्षण घ्यायला सांगायचे, पदवी मिळवायला सांगायचे, कौशल्य आत्मसात करायला सांगायचे; पण त्यानंतर रोजगाराच्या संधीच उपलब्ध नसतील, तर वाढणारी निराशा आणि अस्वस्थता स्वाभाविक आहे.

त्यामुळे प्रियंका गांधींचा दावा राजकीय असला, तरी नीती आयोगाच्या आकडेवारीने उपस्थित केलेले प्रश्न गंभीर आहेत. ८ कोटी ७० लाख तरुण शिक्षण, रोजगार आणि प्रशिक्षणाच्या मुख्य प्रवाहाबाहेर असतील, तर ही केवळ बेरोजगारीची समस्या नाही; ती देशाच्या आर्थिक आणि सामाजिक भवितव्याची समस्या आहे.

## भारत-खाडी व्यापार करार पुन्हा चर्चेत; पश्चिम आशिया संकटानंतर रखडलेल्या वाटाघाटींना वेग?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
दुबई | प्रतिनिधी

पश्चिम आशियातील संकटामुळे काही काळ थांबलेल्या भारत आणि खाडी सहकार्य परिषदेतील मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटींना पुन्हा चालना देण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. भारत आणि खाडी देशांमधील व्यापार आणि गुंतवणूक वाढवण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वाचा मानला जात असला, तरी त्याच्या अंमलबजावणीचा मार्ग अद्याप स्पष्ट झालेला नाही.

२३ ऑगस्ट २०२६ रोजी रियाधमध्ये भारताचे सौदी अरेबियातील राजदूत विपुल यांनी खाडी सहकार्य परिषदेचे महासचिव जासेम मोहम्मद अलबुदैवी यांची भेट घेतली. या बैठकीत भारत-खाडी संबंध अधिक मजबूत करण्याच्या उपायांवर चर्चा झाली. तसेच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवर दोन्ही बाजूंनी विचारांची देवाणघेवाण करण्यात आली.

या बैठकीचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे पुढील महिन्यात होणाऱ्या मंत्रिस्तरीय बैठकीची तयारी. या बैठकीत मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटींना पुढे नेण्यासाठी पुढील दिशा निश्चित होण्याची शक्यता आहे.

भारत आणि खाडी सहकार्य परिषदेने फेब्रुवारी २०२६ मध्ये सर्वसमावेशक व्यापार करारासाठी वाटाघाटी पुन्हा सुरू केल्या होत्या. मात्र जून २०२६ मध्ये पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षामुळे या चर्चांना तात्पुरता ब्रेक लागला. आता परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कराराच्या पुढील टप्प्याबाबत चर्चा पुन्हा सुरू झाली आहे.

खाडी सहकार्य परिषदेत सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कतार, कुवेत, बहरीन आणि ओमान हे सहा देश आहेत. भारतासाठी हा समूह ऊर्जा, गुंतवणूक, व्यापार आणि भारतीय कामगारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

मात्र मुक्त व्यापार करार म्हणजे केवळ व्यापार वाढवण्याचा निर्णय नाही. शुल्ककपात, बाजारपेठेतील प्रवेश, गुंतवणूक, सेवा क्षेत्र आणि संवेदनशील भारतीय उद्योगांचे संरक्षण यांसारख्या मुद्द्यांवर दोन्ही बाजूंमध्ये तडजोड आवश्यक असेल.

त्यामुळे आता खरा प्रश्न असा आहेपश्चिम आशियातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारताला खाडी बाजारपेठेत अधिक प्रवेश मिळणार का, की व्यापार कराराच्या वाटाघाटी पुन्हा राजकीय आणि प्रादेशिक संकटांच्या सावटाखाली येणार? पुढील महिन्यातील मंत्रिस्तरीय बैठक या प्रक्रियेसाठी निर्णायक ठरू शकते.

## साखरेची निर्यात करणाऱ्या भारतावर आयात करण्याची वेळ, जगाचेही गणित बिघडणार; साखर संकटामागे 'ही' दोन कारणे

■ मुंबई : प्रतिनिधी

भारतात सणासुदीचा काळ सुरू होण्यापूर्वीआधीच साखरेच्या वाढत्या किमतींमुळे कडू पणा आणला आहे. अचानक वाढलेल्या साखरेच्या दरांमागे ईथेनॉल हे कारण सांगितले जात आहेत. पण, केंद्र सरकारचे म्हणणे आहे की, इथेनॉलमुळे साखरेच्या दरात कोणतीही वाढ होत नाहीये, पण तरीही साखरेचा तुटवडा निर्माण झाला आहे. जगाला साखरेची निर्यात करणाऱ्या भारतावर आता साखरेची आयात करण्याची वेळ आली आहे.

सरकारच्या मते, सध्या साखरेच्या दरात झालेली वाढ ही अनेक कारणांमुळे झाली आहे. यामध्ये देशांतर्गत उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी असणे, सणासुदीच्या काळापूर्वी मागणीत झालेली वाढ, हवामानाशी संबंधित कारणांमुळे उसाच्या पिकाचे झालेले नुकसान, जागतिक स्तरावर साखरेच्या पुरवठ्यात आलेली घट आणि उद्योगातील काही घटकांकडून होणारी सट्टेबाजी आणि साठेबाजी यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

चालू हंगामात साखरेचे उत्पादन सुमारे ३०६ लाख मेट्रिक टन राहण्याची अपेक्षा आहे, तर ऊस उत्पादक राज्यांनी सुरुवातीला हा अंदाज सुमारे ३४३ लाख मेट्रिक टन इतका वर्तवला होता. उसाच्या पिकाला रेड रॉट आणि टॉप बोरर या रोगांचा फटका बसला आहे. त्याचबरोबर, वेळेआधी झालेल्या अतिवृष्टीमुळे साचलेल्या पाण्यानेही उसाचे मोठे नुकसान केले आहे. असे असले तरी केंद्र सरकारचा दावा आहे की, उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी असूनही देशात साखरेचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, जो ऑक्टोबरमध्ये नवीन गाळप हंगाम सुरू होईपर्यंत देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेसा आहे. साखरेच्या किमतीतील ही वाढ केवळ भारतातच झालेली नाही. साखरेचे हे संकट आता संपूर्ण जगावर येणार आहे. जगात उसाची सर्वाधिक शेती करणाऱ्या ब्राझीलमध्येही साखरेची टंचाई निर्माण होत आहे. यूएस डिपार्टमेंट ऑफ फॉरेन ॲग्रिकल्चर सर्व्हिसच्या आकडेवारीनुसार, ब्राझील जगातील एकूण २४ टक्के उसाचे उत्पादन करतो, त्यानंतर भारताचा वाटा १६ टक्के इतका आहे.

## सरकारी नोकऱ्या कुठे गायब? केंद्रातील ८.२३ लाख पदे रिक्त; प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : वृत्तसंस्था

देशातील तरुणांसाठी सरकारी नोकरी आजही स्थैर्य, सुरक्षितता आणि सन्मानाचे प्रतीक मानली जाते. लाखो तरुण वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षा देतात, हजारो रुपये अर्ज आणि प्रशिक्षणावर खर्च करतात, पण दुसरीकडे केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांमध्ये आणि विभागांमध्ये ८ लाख २३ हजारांहून अधिक मंजूर पदे रिक्त असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ही आकडेवारी केवळ बेरोजगारीचा प्रश्न दाखवत नाही, तर सरकारच्या भरती प्रक्रियेतील दिरंगाई आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही गंभीर प्रश्न उपस्थित करते.

२४ ऑगस्ट २०२६ रोजी समोर आलेल्या माहितीप्रमाणे, मध्य प्रदेशातील माहिती अधिकार कार्यकर्ते चंद्रशेखर गौर यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत केंद्र सरकारकडे माहिती मागितली होती. त्याला केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या खर्च विभागाअंतर्गत असलेल्या वेतन संशोधन विभागाने दिलेल्या उत्तरातून ही आकडेवारी समोर आली.

माहिती अधिकाराच्या उत्तरानुसार, केंद्र सरकारच्या ८० मंत्रालये आणि विभागांमध्ये एकूण ३९ लाख २३ हजार २१२ नागरी नियमित पदे मंजूर आहेत. मात्र १ मार्च २०२४ रोजी त्यापैकी केवळ ३० लाख ९९ हजार ५५६ पदांवर कर्मचारी कार्यरत होते. म्हणजेच तब्बल ८ लाख २३ हजार ५५६ पदे रिक्त होती.

या आकडेवारीचा अर्थ असा की केंद्र सरकारच्या मंजूर नागरी पदांपैकी सुमारे २१ टक्के पदे रिक्त होती. म्हणजे जवळपास प्रत्येक पाचपैकी एक मंजूर पद कर्मचारीविना होते. सरकारकडे पदे मंजूर आहेत, अर्थसंकल्पात विभागांसाठी निधीची तरतूद केली जाते; मात्र प्रत्यक्षात त्या पदांवर मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने प्रशासनाच्या कामकाजावर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.

या रिक्त पदांमध्ये सर्वाधिक भार संरक्षण मंत्रालयाच्या नागरी आस्थापना आणि रेल्वे मंत्रालयावर आहे. या दोन मंत्रालयांमधील रिक्त पदांची संख्या मिळून केंद्रातील एकूण रिक्त पदांच्या ५८ टक्क्यांहून अधिक आहे.

रेल्वेसारख्या देशाच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या यंत्रणेत मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असणे हा गंभीर मुद्दा आहे. तिकीट व्यवस्था, देखभाल, अभियांत्रिकी, सुरक्षा, प्रशासन आणि इतर सेवांवर मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता असते. दुसरीकडे संरक्षण मंत्रालयातील नागरी पदेही प्रशासन आणि संरक्षण यंत्रणेच्या पूरक कामांसाठी महत्त्वाची आहेत.

आता यातील सर्वात मोठा विरोधाभास असा आहे की देशात लाखो तरुण रोजगाराच्या शोधात आहेत आणि सरकारी नोकऱ्यांसाठी प्रचंड स्पर्धा आहे. एका जागेसाठी हजारो अर्ज येत असताना दुसरीकडे ८ लाख २३ हजार ५५६ मंजूर पदे रिक्त राहतात, ही परिस्थिती सरकारी भरती व्यवस्थेवर थेट प्रश्न उपस्थित करते.

ही पदे का रिक्त आहेत? भरती प्रक्रिया इतकी संथ का आहे? परीक्षा घेतल्यानंतर निकाल, कागदपत्र पडताळणी आणि नियुक्तीमध्ये किती वेळ जातो? निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या तुलनेत नवीन भरतीचे नियोजन केले जाते का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सरकारला प्रत्यक्षात मनुष्यबळाची गरज आहे की नाही?

जर पदे आवश्यक नसतील तर ती वर्षानुवर्षे मंजूर का ठेवली जातात? आणि पदे आवश्यक असतील तर त्यावर भरती का केली जात नाही?

८.२३ लाख रिक्त पदांचा आकडा म्हणजे केवळ रोजगाराची संधी गमावलेली नाही; तो सरकारी व्यवस्थापनातील संभाव्य अकार्यक्षमतेचा आरसाही आहे. एकीकडे तरुणांना रोजगारनिर्मितीची आश्वासने दिली जातात आणि दुसरीकडे उपलब्ध सरकारी पदांवरही वेळेत भरती होत नसेल, तर सरकारच्या रोजगार धोरणावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.